०१८ ③

## कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

### महाराष्ट्र शासन

क्रमांक: नमाशा १००२/(१९६/२००२)/माशि १.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ६ एप्रिल, २००२

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे

विषय- नवीन माध्यमिक शाळांना परवानगी मिळणेबाबत.
(इंग्रजी माध्यम).

नवीन माध्यमिक शाळेला परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खाली नमूद केलेल्या तीन शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व शैक्षणिक वर्षापासून इंग्रजी माध्यमातून कायम विना अनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | शैक्षणिक वर्ष | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, वडगाव बु. सर्व्हे नं.४४/१, पुणे ४११ ०४१ | कोंढवा बु, ता.हवेली, जि.पुणे | २००२-२००३ | इंग्रजी | ८वी |
| २ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, वडगाव बु. सर्व्हे नं.४४/१, पुणे ४११ ०४१ | नऱ्हेगाव, ता.हवेली, जि.पुणे | २००२-२००३ | इंग्रजी | ८वी |
| ३ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, वडगाव बु. सर्व्हे नं.४४/१, पुणे ४११ ०४१ | कुसगाव, ता.मावळ, जि.पुणे | २००२-२००३ | इंग्रजी | ८वी |

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे:-

अ) सदर माध्यमिक शाळेला शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ब) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

क) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही, या विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीने लेखी हमीपत्र संबंधित विभागीय

PRINCIPAL
SINHGAD CITY SCHOOL
S. No. 501, Tilekar Nagar
Kondhwa (Bk.) Pune-4110

PRINCIPAL
SINHGAD PUBLIC SCHOOL
Kusgaon( Bk.), Lonavala - 410 401.

PRINCIPAL
SINHGAD CITY SCHOOL
S. No. 501, Tilekar Nagar,

शिक्षण उपसंचालकांनी मान्यता घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते मूळ प्रतपण जतन करुन ठेवावे.

३. ही परवानगी देताना सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थांना नवीन माध्यमिक शाळांची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.-

१) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

२) संबंधित संस्था,मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर ~~केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५०~~ प्रमाणे नोंदणीकृत आहे.

३) सदर संस्थांनी चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

४. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन, त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित पाठविण्यात यावा.

(मि.य.मेता)
कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

१) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य ,पुणे.
२) शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
४) मा.शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) निवड नस्ती (माशि-१)

PRINCIPAL
SINHGAD CITY SCHOOL
S. No. 50/, Tilekar Nagar,
Kondhwa (Bk.) Pune-411048

SINHGAD CITY SCHOOL * Kondhwa, Pune-48 *

PRINCIPAL
SINHGAD CITY SCHOOL
S. No. 50/, Tilekar Nagar,
Kondhwa (Bk.) Pune-411048

09/03/23
PRINCIPAL
SINHGAD PUBLIC SCHOOL
Kusgaon( Bk.), Lonavala - 410 401

SINHGAD PUBLIC SCHOOL Kusgaon (Bk) Lonavala Pune CBSE AFF. NO 1130100